पालघर, नाशिक २, धुळे, किनवट जि. नांदेड, यवतमाळ, गोंदिया व चंद्रपूर येथे नवीन सात अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांची स्थापना करणेबाबत ..

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्रमांक : एसटीसी-२११९/प्र.क्र.३४ /का.१०

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक - १३ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा</u> : १) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक.एसटीसी १०९०/२३९४२/१८६/का. १० दिनांक ३ जून, १९९२

२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक. एसटीसी १८९५/१८२ /भाग- २/का. १० दिनांक १५ मार्च, १९९६

३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक एसटीसी १००६/प्र.क्र. १८६/का १० दिनांक ८ डिसेंबर, २००६.

<u>प्रस्तावना :-</u>

शासकीय व निमशासकीय सेवेत अनुसूचित जमातीकरीता राखीव पदे ठेवलेली आहेत. त्याचप्रमाणे शैक्षणिक संस्थांमध्ये देखील राखीव जागा ठेवलेल्या आहेत. त्यापैकी व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेताना जातीच्या प्रमाणपत्राची तपासणी होवून वैधता प्रमाणपत्र सादर केलेल्यांनाच त्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जातो. नियुक्त्यांच्या वेळी वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची तरतूद आहे. त्याचप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या प्रभागातून निवडून आलेल्या उमेदवारांच्या जातीच्या प्रमाणपत्राची तपासणी केली जावी अशा प्रकारचे देखील शासनाचे आदेश आहेत. तसेच जाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांकडे वेळोवेळी नवीन कामे सोपविल्यामूळे त्यांच्याकडील कामे फार वाढलेली आहेत.

यापूर्वी विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या राखीव जागांवरील प्रवेश हे तात्पुरत्या स्वरुपात पडताळणीच्या अधीन राहून देण्यात येत होते. परंतु मा.सर्वोच्च न्यायालयाने सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या राखीव जागांवरील वैधता प्रमाणपत्र धारक विद्यार्थ्यांचेच प्रवेश निश्चित करण्याबाबत पारित केलेल्या आदेशानुसार या विभागाच्या अधिपत्याखालील अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांना विविध व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या राखीव जागेवर प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे दावे प्राथम्याने व विहित कालमर्यादेत निकाली काढणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे विविध शैक्षणिक

संस्थांमधील राखीव जागांवरील प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रकरणे प्राथम्याने त्वरीत निकाली काढण्याची जबाबदारी समित्यांवर असल्याने, सदर तपासणी समित्यांचे सक्षमीकरण (Strengthening) करणे आवश्यक आहे. तसेच नव्याने दाखल होणाऱ्या प्रकरणांची प्रचंड संख्या व आगामी काळात अपेक्षित वाढता ओघ पाहता सध्याच्या समित्यांच्या बळकटीकरणाबरोबरच नवीन समित्यांची स्थापना आवश्यक झालेली आहे. मा. उच्च न्यायालयाने देखील अस्तित्वातील तपासणी समित्यांच्या संख्येत वाढ करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. सदर बाब विचारात घेवून अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासण्याचे काम वेळेवर व्हावे म्हणून पालघर, नाशिक २, धुळे, किनवट जि. नांदेड, यवतमाळ, गोंदिया व चंद्रपूर येथे सात नवीन अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या व त्यांना सहाय्य करण्यासाठी नवीन सात दक्षता पथके स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर प्रस्तावावर मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक ३ सप्टेंबर, २०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत चर्चा झाली. सदर बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे -

शासन निर्णय :

सध्या पुणे, ठाणे, नाशिक, नंदुरबार, औरंगाबाद, अमरावती, नागपूर व गडचिरोली येथे आठ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या व आठ दक्षता पथके कार्यरत आहेत. मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक ३ सप्टेंबर, २०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सध्या अस्तित्वात असलेल्या आठ समित्यांव्यतिरिक्त पालघर, नाशिक २, धुळे, किनवट जि. नांदेड, यवतमाळ, गोंदिया व चंद्रपूर येथे सात नवीन अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या व त्यांना सहाय्य करण्यासाठी नवीन सात दक्षता पथके स्थापन करण्यास शासन मंजूरी देत आहे.

२. तसेच नव्याने स्थापन करावयाच्या सात अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्या व दक्षता पथकांकरिता ७० नवीन पदे निर्माण करण्यास शासन मंजूरी देत आहे. पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

अ.क्र	**पदनाम**	**वेतन मॅट्रिक्स व वेतन स्तर**	**पदसंख्या**
१	सह आयुक्त	S-२५- ७८८००-२०९२००	७
२	उपसंचालक (सं)	S-२३-६७७००-२०८७००	७
३	वरिष्ठ संशोधन अधिकारी	S-२०-५६१००-१७७५००	७
४	पोलीस उप अधिक्षक	S-२०-५६१००-१७७५००	७
५	पोलीस निरीक्षक	S-१८-४९१००-१५५८००	१४
६	संशोधन अधिकारी	S-१५-४१८००-१३२३००	१४
७	पोलीस शिपाई	S-७-२१७००-६९१०० (विशेष वेतन. २७५)	१४
एकूण पदसंख्या			**७०**

समितीला सहाय्य करण्यासाठी उपरोक्त पदांव्यतिरिक्त खालील प्रमाणे ७० पदे कंत्राटीतत्वावर भरण्यास शासन मंजूरी देत आहे.

अ.क्र	पदनाम		प्रती महा मानधन	पदसंख्या
१	विधी अधिकारी		४०,०००	७
२	कनिष्ठ प्रशासकीय अधिकारी		३०,०००	७
३	संशोधन सहाय्यक		३०,०००	७
४	लिपीक टंकलेखक		२०,०००	७
५	माहिती तंत्रज्ञान तथा संगणक सहाय्यक		३०,०००	७
६	लघुटंकलेखक		२५,०००	७
७	शिपाई	बाह्यस्त्रोताव्दारे	१२,०००	७
८	पहारेकरी		८,०००	१४
९	सफाईगार		८,०००	७
एकूण पदसंख्या				**७०**

३. हा सर्व कर्मचारीवृंद आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या नियंत्रणाखाली राहील. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे हे या समित्यांचे व दक्षता पथकांचे मुख्य समन्वयक म्हणून राहतील आणि समित्या व दक्षता पथके यांच्या कामात सुसूत्रता साधण्याच्यादृष्टीने वेळोवेळी मागदर्शन करतील.

४. पालघर, नाशिक २, धुळे, किनवट जि. नांदेड, यवतमाळ, गोंदिया व चंद्रपूर येथे नव्याने स्थापन करण्यात येत असलेल्या तपासणी समित्यांची रचना खालील प्रमाणे राहील-

१)	आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे	अध्यक्ष
२)	सह आयुक्त, आदिवासी विकास	उपाध्यक्ष
३)	उप संचालक (संशोधन)	सदस्य
४)	वरिष्ठ संशोधन अधिकारी	सदस्य
५)	संशोधन अधिकारी	सदस्य

अनुसूचित जमातीच्या दाव्याच्या संदर्भात निर्णय घेण्यासाठी प्रत्येक सुनावणीच्या मुलाखतीच्यावेळी तीन सदस्यांची गणपूर्ती आवश्यक राहील. या तीन सदस्यांपैकी कमीत कमी एक सदस्य अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष हे राहतील.

५. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांना पुढील आदेश होईपर्यंत अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पालघर, नाशिक २, धुळे, किनवट जि. नांदेड, यवतमाळ, गोंदिया व चंद्रपूर येथील

समित्यांसाठी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते व इतर अनुषंगिक खर्च करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. हा खर्च मागणी क्रमांक टि-५,२२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण- ०२-अनुसूचित जमातीचे कल्याण ७९६ जनजाती क्षेत्र उपयोजना ०२ - जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजना (०२) २४ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती (कार्यक्रम) (२२२५४१२२) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकावा. या रकमेतून खालील बाबींवर खर्च करण्यास शासन मंजूरी देत आहे.

नियमीत पदांचा आवर्ती खर्च (वेतन व भत्ते)	रु. ५,०३,३५,३२०/-
कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मानधनावरील खर्च	रु. १,७७,२४,०००/-
अनावर्ती खर्च (स्टेशनरी व फर्निचर)	रु. २,०२,३०,०००/-

७. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५४५/२०१९/व्यय-१४, दिनांक ०७.०९.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदरचा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९१३१५०२१२९२२४ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Laxmikant Gopalrao Dhoke

Digitally signed by Laxmikant Gopalrao Dhoke
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Tribal Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=413beeca50b65438c7a037917ccf1f24d8ca684b65640df6372ea731ffac4dfc, serialNumber=e714bbcd4d43c6782884c7e7a2091f9f1edc1d97ebb542c48b98fb8c8bdd6cf4, cn=Laxmikant Gopalrao Dhoke
Date: 2019.09.13 15:08:09 +05'30'

(ल. गो. ढोके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३) मा.मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) सर्व मा.विधीमंडळ सदस्य
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
७) अपर मुख्य सचिव, महसुल विभाग, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
९) अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१३) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

१४) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
१५) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
१६) सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास
१७) सर्व सह आयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती
१८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
१९) सर्व विभागीय आयुक्त
२०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग
२१) प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
२२) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई
२३) प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपिल शाखा) मुंबई
२४) प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ, औरंगाबाद/नागपूर
२५) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२६) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद
२७) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर खंडपीठ, नागपूर
२८) सचिव, गृह मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली
२९) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई/नागपूर
३०) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई/नागपूर
३१) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
३२) सह संचालक, लेखा व कोषागरे, नविन प्रशासकीय इमारत, पाचवा मजला, मुंबई
३३) सर्व अध्यक्ष, अनुसूचित जाती प्रमाणपत्र तपासणी समिती
३४) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
३५) सर्व मंत्रालयीन विभाग,
३६) सर्व कार्यासने, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
३७) निवड नस्ती.